महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन आदेश क्रमांकः एएससी-१५१९/प्र.क्र.५७/१४-अ

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १७ मे, २०१९

संदर्भ - १) सा.प्र.वि.पत्र क्र.संकीर्ण-१००४/प्र.क्र.४८/०४/१४-अ, दिनांक ७.६.२००४.
२) सा.प्र.वि.पत्र क्र.संकीर्ण-१००७/प्र.क्र.११८/०७/१४-अ, दिनांक १३.९.२००७.
३) सा.प्र.वि. आदेश क्र.सीसीए-१७११/प्र.क्र.९३/२०११/१४-अ, दि.८.१२.२०११.

-आदेश-

मंत्रालयीन विभागातील खालील लिपिक-टंकलेखक (गट (क) अराजपत्रित- वेतनश्रेणी एस-६ रु.१९९००-६३२००) यांना सन २०१८-२०१९ या निवडसूची वर्षासाठी सहायक कक्ष अधिकारी (गट(ब) अराजपत्रित- वेतनश्रेणी एस-१४ रु.३८६००-१२२८००) पदावर या आदेशाद्वारे विहित अटीच्या अधीनतेने निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात तदर्थ पदोन्नती देण्यात येत आहे. तसेच सदर लिपिक-टंकलेखक यांची सहायक कक्ष अधिकारी पदावरील निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात तदर्थ पदोन्नतीनंतरची पदस्थापना त्यांच्या नावासमोर स्तंभ-६ मध्ये दर्शविण्यात आलेल्या विभागामध्ये करण्यात येत आहे.

अ.क्र.	श्री / श्रीमती	नांव	प्रवर्ग	सध्याचा विभाग	पदोन्नतीनंतर पदस्थापनेचा विभाग
१	२	३	४	५	६
१	श्रीमती	र.ज.घरत	विमाप्र	वित्त विभाग	वित्त विभाग
२	श्री	श.ग.मंचेकर	इमाव	आदिवासी विकास विभाग	आदिवासी विकास विभाग
३	श्री	वि.वा.कांबळी	खुला	सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग	सार्वजनिक बांधकाम विभाग
४	श्रीमती	अ.ला.सावंत	खुला	महसूल व वन विभाग	महसूल व वन विभाग
५	श्री	दि.त्र्यं.शेटे	खुला	सामान्य प्रशासन विभाग	अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
६	श्रीमती	स्ने.सु.शिवणेकर	खुला	जलसंपदा विभाग	जलसंपदा विभाग
७	श्रीमती	ल.र. पिल्लाई	खुला	उच्च व तंत्रशिक्षण विभाग	उच्च व तंत्रशिक्षण विभाग
८	श्रीमती	वै.वि.कडू (शा.बा.मळेकर)	खुला	नियोजन विभाग	नियोजन विभाग

अ.क्र.	श्री / श्रीमती	नांव	प्रवर्ग	सध्याचा विभाग	पदोन्नतीनंतर पदस्थापनेचा विभाग
१	२	३	४	५	६
९	श्रीमती	स.अ.कोलते	खुला	वित्त विभाग	उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
१०	श्री	वि.ज.निकाळे	अजा	सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग	सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
११	श्री	यो.बा.कांबळे	अजा	कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग	कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
१२	श्रीमती	नि.रा.जाधव	अजा	महसूल व वन विभाग	उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
१३	श्री	सं.शं.शेळके	खुला	अल्पसंख्यांक विकास विभाग	नगर विकास विभाग
१४	श्री	स.द.सागवेकर	खुला	सामान्य प्रशासन विभाग	सामान्य प्रशासन विभाग
१५	श्री	प्र.भि.पुजारे	खुला	पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग	पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
१६	श्रीमती	स्वा.अ.घाटे	खुला	मृद व जलसंधारण विभाग	मृद व जलसंधारण विभाग
१७	श्रीमती	म.म.कदम	खुला	वित्त विभाग	वित्त विभाग
१८	श्री	उ.सा.साळगावकर	खुला	विधि व न्याय विभाग	जलसंपदा विभाग
१९	श्री	र.ब.सुरळकर	विमाप्र	सामान्य प्रशासन विभाग	गृह विभाग
२०	श्री	प्र.गो.भांबिड	इमाव	उच्च व तंत्रशिक्षण विभाग	महसूल व वन विभाग
२१	श्रीमती	सु.पां.शिंदे	खुला	विधि व न्याय विभाग	महिला व बालविकास विभाग
२२	श्री	चं.रा.आदम	खुला	पर्यावरण विभाग	पर्यावरण विभाग

अ.क्र.	श्री / श्रीमती	नांव	प्रवर्ग	सध्याचा विभाग	पदोन्नतीनंतर पदस्थापनेचा विभाग
१	२	३	४	५	६
२३	श्रीमती	नि.सु.शिरवटकर	इमाव	सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग	सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
२४	श्रीमती	गी.शं.दळवी	खुला	ग्रामविकास विभाग	वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
२५	श्रीमती	प्रा.प्र.नागवेकर	इमाव	गृहनिर्माण विभाग	गृहनिर्माण विभाग
२६	श्रीमती	शु.भा.देशमाने	खुला	शालेय शिक्षण व क्रीडा विभाग	नगर विकास विभाग
२७	श्री	सु.रा.मोरे	अजा	पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग	गृह विभाग
२८	श्री	स.ल.पाटील	विमाप्र	सामान्य प्रशासन विभाग	कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
२९	श्री	जि.प्र.लाटकर	खुला	अल्पसंख्याक विकास विभाग	पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
३०	श्री	म.का.शेळके	खुला	सामान्य प्रशासन विभाग	सार्वजनिक आरोग्य विभाग
३१	श्रीमती	प्र.प्र.बांबुळकर	इमाव	सामान्य प्रशासन विभाग	सामान्य प्रशासन विभाग
३२	श्रीमती	सु.तु.खोत	खुला	वित्त विभाग	सार्वजनिक बांधकाम विभाग
३३	श्रीमती	प.अ.कदम	अजा	जलसंपदा विभाग	जलसंपदा विभाग
३४	श्रीमती	र.रा.वेंगुर्लेकर	खुला	विधि व न्याय विभाग	विधि व न्याय विभाग
३५	श्रीमती	शु.सं.मुळीक	इमाव	जलसंपदा विभाग	जलसंपदा विभाग
३६	श्रीमती	सं.सु.मोरये	खुला	नियोजन विभाग	जलसंपदा विभाग
३७	श्री	रा.द.पिसाट	खुला	महसूल व वन विभाग	महसूल व वन विभाग

अ.क्र.	श्री / श्रीमती	नांव	प्रवर्ग	सध्याचा विभाग	पदोन्नतीनंतर पदस्थापनेचा विभाग
१	२	३	४	५	६
३८	श्री	शै.श.म्हापसेकर	खुला	विधि व न्याय विभाग	विधि व न्याय विभाग
३९	श्रीमती	श.कि.कुलकर्णी	खुला	ग्रामविकास विभाग	ग्रामविकास विभाग
४०	श्री	भू.दा.केणी	विमाप्र	अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग	अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
४१	श्री	प्र.भ.सावंत	खुला	महसूल व वन विभाग	महसूल व वन विभाग
४२	श्री	रा.के.नाईक	विमाप्र	सार्वजनिक बांधकाम विभाग	गृह विभाग
४३	श्रीमती	शि.रा.तरे	विमाप्र	सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग	नियोजन विभाग
४४	श्री	प्र.मो.सावंत	खुला	शालेय शिक्षण व क्रीडा विभाग	शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

२. मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्रमांक २७९७/२०१५ मध्ये दिनांक ०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयान्वये पदोन्नतीमधील आरक्षण अवैध ठरविले आहे. मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ दाखल केली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. याबाबत विधि व न्याय विभागाने दिनांक २८.१२.२०१७ रोजी दिलेल्या अभिप्रायानुसार खुल्या प्रवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यास कोणतीही वैधानिक अडचण नसल्याचे अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार तूर्तास पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून भरण्यात यावीत. अशी कार्यवाही करताना सेवाज्येष्ठता यादीमधील मागासवर्गीय अधिकारी / कर्मचारी यांना पदोन्नती देण्यापूर्वी ते दिनांक २५.०५.२००४ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार आरक्षणाचा लाभ मिळून सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत, याची खात्री प्रत्येक प्रशासकीय विभागाने करावी, अशा सूचना सा.प्र.वि./कार्यासन १६ब ने दिनांक २९.१२.२०१७ रोजीच्या पत्रान्वये दिल्या आहेत.

३. दरम्यान, पदोन्नतीमधील आरक्षणाबाबत राज्य शासनाने दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ व इतर राज्यांच्या याचिकेबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १५.०४.२०१९ रोजी पुढील प्रमाणे आदेश पारित केले आहेत."*Until further orders status quo, as it exists today, shall be maintained."* याबाबत कार्यासन १६-ब यांनी पुढील प्रमाणे अभिप्राय दिले आहेत. *"दिनांक १५.०४.२०१९ रोजी व आताही या कार्यासनाच्या दिनांक २९.१२.२०१७ च्या पत्रातील सूचना अस्तित्वात आहेत. सबब, पुढील आदेश होईपर्यंत सर्व पदोन्नत्यांबाबत या कार्यासनाच्या दिनांक २९.१२.२०१७ च्या पत्रातील सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी."* सबब, सदर या आदेशातील पदोन्नत्या शासन पत्र दिनांक २९.१२.२०१७ मधील सूचनांनुसार केवळ तात्पुरत्या स्वरुपात व कार्यासन १६-ब यांनी दिलेल्या उपरोक्त अभिप्रायानुसार देण्यात येत आहेत.

त्यानुसार सदर लिपिक-टंकलेखक यांची सहायक कक्ष अधिकारी पदावरील तदर्थ पदोन्नती मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेली विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ च्या अधीन राहून पदोन्नतीच्या कोट्यातील खुल्या प्रवर्गातील रिक्त पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येत आहे. त्याशिवाय सदर तदर्थ पदोन्नती खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

(अ) **सदरची पदोन्नती ही प्रशासकीय निकड म्हणून तात्पुरत्या स्वरुपातील तदर्थ पदोन्नती राहील.**

(ब) सदर पदोन्नत्या, सद्य:स्थितीत लिपिक-टंकलेखक पदावरुन सहायक कक्ष अधिकारी पदावर पदोन्नतीसाठी पात्र लिपिक-टंकलेखकांच्या ज्येष्ठता यादीबाबत कोणतेही न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नाही, तसेच या ज्येष्ठता यादीस आव्हानित देखील करण्यात आलेले नाही ही वस्तुस्थिती विचारात घेऊन केवळ तात्पुरत्या/तदर्थ स्वरुपात देण्यात येत आहेत.

(क) लिपिक-टंकलेखकांना सहायक कक्ष अधिकारी पदावरील तदर्थ पदोन्नती त्यांचेविरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी प्रलंबित नाही तसेच त्यांनी संगणक अर्हता धारण केलेली आहे अथवा सदर अर्हता धारण करण्याची त्यांना सूट मिळालेली आहे.

(ड) सदर तदर्थ पदोन्नती अकरा महिन्यांच्या कालावधीसाठी असेल तथापि, त्यानंतर सदरहू तदर्थ पदोन्नतीस मुदतवाढ देण्याची कार्यवाही सामान्य प्रशासन विभाग पत्र क्र.संकीर्ण-१००७/ प्र.क्र.११८/०७/१४-अ, दिनांक १३.९.२००७ अनुसार संबंधित विभागामार्फत करण्यात यावी.

(इ) सामान्य प्रशासन विभागाकडून नियमित निवडसूचीमध्ये सहायक कक्ष अधिकारी नियुक्त केल्यानंतर सदर तदर्थ पदोन्नती संपुष्टात येईल.

(ई) या निव्वळ तात्पुरत्या तदर्थ पदोन्नतीमुळे संबंधित लिपिक-टंकलेखक यांना नियमित पदोन्नतीचे, ज्येष्ठतेचे किंवा आणखी कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

(उ) सदर तदर्थ पदोन्नती तात्पुरत्या स्वरुपात असून सदर पदावर संबंधितांचा कायमस्वरुपी धारणाधिकार राहणार नाही.

(ऊ) सदर पदोन्नत्या तदर्थ असून या पदोन्नत्या केवळ पदोन्नत कोट्यात उपलब्ध होणाऱ्या पदांनुसार नियमित करण्यात येतील.

४. संबंधित लिपिक-टंकलेखक यांनी सहायक कक्ष अधिकारी पदाची तदर्थ पदोन्नती न स्वीकारल्यास सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/का.१२, दिनांक १२.०९.२०१६ अन्वये त्यांचे नाव सन २०१८-२०१९ च्या निवडसूचीतून काढून टाकण्यात येईल व पुढील दोन वर्षी होणाऱ्या निवडसूच्यांमध्ये त्यांच्या नावाचा विचार न करता तिसऱ्या वर्षाच्या निवडसूचीत सहायक कक्ष अधिकारी पदावरील पदोन्नतीसाठीची पात्रता तपासण्यात येईल.

५. महाराष्ट्र राज्याचे प्रशिक्षण धोरणातील तरतुदीनुसार पदोन्नतीनंतरचे प्रशिक्षण घेणे संबंधितांवर बंधनकारक राहील.

६. सहायक कक्ष अधिकारी पदावरील तदर्थ पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्यापुर्वी संबंधित मंत्रालयीन विभागाने लिपिक-टंकलेखकांचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राबाबतची खातरजमा करण्यात यावी.

७. मागास प्रवर्गातील लिपिक-टंकलेखक यांची निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती ही शासन निर्णय दिनांक २५.०५.२००४ मधील तरतूदीनुसार त्यांना आरक्षणाचा लाभ मिळून सेवाज्येष्ठता यादीत वरच्या स्थानावर आले नाहीत या अटीच्या अधीन राहून करण्यात येत आहे. संबंधित विभागाने याची खातरजमा करावी.

८. सदर लिपिक-टंकलेखक यांची सहायक कक्ष अधिकारी पदावरील निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात तदर्थ पदोन्नती ही त्यांच्याविरुध्द प्रस्तुत आदेशाच्या दिनांकापर्यत कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी सुरु झालेली नाही वा प्रस्तावित नाही या धारणेच्या अधीन राहून देण्यात येत आहे. संबंधित विभागाने याची खातरजमा करावी.

९. सदर आदेशामधील अनुक्रमांक २१ येथील श्री श्रीमती सु.पां.शिंदे, अनुक्रमांक २२ येथील श्री. चं.रा.आदम, अनुक्रमांक २५ येथील श्रीमती प्रा.प्र. नागवेकर, अनुक्रमांक ३० येथील श्री.म.का.शेळके, तसेच अनुक्रमांक ३८ येथील श्री.शै.श.म्हापसेकर, यांचे वयाचे ५४ वर्षानंतरचे पुनर्विलोकनाचे आदेश संबंधित विभागाने तात्काळ सामान्य प्रशासन विभागास सादर करावे या अटीच्या अधिन राहून तदर्थ पदोन्नती करण्यात येत आहे.

१०. हे आदेश तात्काळ अंमलात येतील. पदोन्नत झालेल्या लिपिक-टंकलेखकांना संबंधित विभागाने तात्काळ कार्यमुक्त करुन या विभागास कळवावे. तसेच पदोन्नत लिपिक-टंकलेखकांनी पदस्थापना केलेल्या विभागात तात्काळ रुजू व्हावे. त्यांच्या पदस्थापनेत बदल करण्यासंबंधीच्या विनंतीची दखल घेण्यात येणार नाही.

११. सदर आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०५१७१७०००८८६०७ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ada8a72725a47b4f0, serialNumber=54b11b1ccbdc577d71dce3b313c3fef5dc2ad659e360f73b682d6b6fccb8aecf, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2019.05.17 17:08:08 +05'30'

(ग.भि.गुरव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

संबंधित लिपिक-टंकलेखक (संबंधित मंत्रालयीन विभागामार्फत)

प्रत,

१. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव (आस्थापना), संबंधित मंत्रालयीन विभाग,
२. सह सचिव / उप सचिव (आस्थापना), संबंधित मंत्रालयीन विभाग (संबंधित
३. कक्ष अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, का.क्र.१४,१४-अ, १४-ब. मंत्रालयीन
४. निवड नस्ती/संग्रहार्थ (कार्यासन १४-अ) विभागांमार्फत)